ठाणे, शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०२४ | वर्ष : १३, अंक : १२३ , पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे




अग्रलेख

**विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे वाढते प्रमाण...**

भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसंदर्भात नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (एनसीआरबी) च्या डेटावर आधारित निराशाजनक आकडेवारी समोर आली आहे. या नवीन अहवालानुसार, विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



या या! तुमच्यासारख्या स्टार हिरॉईन आमच्या पक्षात आल्या आहेत तर भाग्यच उजळणार आमचं आणि जनतेचंही!

# संपूर्ण देशात ५ दिवस पासपोर्ट सेवा राहणार बंद

■ काल रात्री ८ पासून ते २ सप्टेंबरपर्यंत सुविधा बंद

**मुंबई – देशभरातील पासपोर्ट सेवा ५ दिवसांसाठी बंद राहणार आहे. पासपोर्ट विभागाने एक डव्हायजरी जारी करुन याबाबतची माहिती दिली आहे. तांत्रिक देखभालीमुळं (technical maintenance) पासपोर्ट सेवा पोर्टल आजपासून म्हणजे २९ ऑगस्ट रात्री ८ वाजल्यापासून ते २ सप्टेंबरच्या सकाळपर्यंत बंद राहणार असल्याचे विभागाने म्हटले आहे. या कालावधीत पासपोर्ट केंद्रांवर कोणत्याही नवीन अपॉइंटमेंट्स शेड्यूल केल्या जाणार नाहीत. तसेच आधी बुक केलेल्या अपॉइंटमेंट्स पुन्हा शेड्यूल केल्या जाणार आहेत.**


दरम्यान, एखाद्याला जर नवीन पासपोर्ट काढायचा असेल तर आता तुम्हाला १५ दिवस वाट पाहावी लागणार आहे. त्याचवेळी, जर तुम्ही आधीच नवीन पासपोर्टसाठी अर्ज केला असेल आणि तुम्हाला त्यासाठी ३० ऑगस्ट ते २ सप्टेंबर दरम्यान तारीख मिळाली असेल, तर ती देखील रद्द केली जाईल आणि वाढवली जाईल. या पाच दिवसांमध्ये नागरिकांसाठी आणि सर्व MEA/RPO/BOI/ISP/DOP/ पोलीस अधिकाऱ्यांसाठी ही प्रणाली उपलब्ध नसेल, असं पासपोर्ट विभागाने डव्हायझरीमध्ये म्हटले आहे.

### ब्लूकव्हर पासपोर्ट

ब्लूकव्हर पासपोर्ट हा एक सामान्य पासपोर्ट आहे. हा पासपोर्ट कोणत्याही भारतीय नागरिकाला दिला जातो.

### मरुन कव्हर पासपोर्ट

मरुन कव्हर पासपोर्ट हा डिप्लोमॅटिक पासपोर्ट आहे. हा पासपोर्ट अधिकृत मुत्सद्दी आणि सरकारी पदे असलेल्या सदस्यांसाठी भारत सरकारद्वारे जारी केले जाते.




### पाच दिवस विभागात कोणतेही काम होणार नाही

पाच दिवस विभागाचे कोणतेही काम होणार नाही. सेवा बंद झाल्याचा परिणाम पासपोर्ट सेवा केंद्र तसेच स्थानिक पासपोर्ट कार्यालय आणि परराष्ट्र व्यवहार मंत्रालयात दिसून येईल.

### देशभरातील अर्जदारांना अडचणींना सामोरे जावे लागणार

दरम्यान, आधीच्या अर्जानंतर ३० ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत अपॉइंटमेंट मिळाल्यास ती दुसऱ्या तारखेला बदलावी लागणार आहे. अशा तऱ्हेने केवळ दिल्लीच नव्हे तर देशभरातील अर्जदारांना अडचणींना सामोरे जावे लागू शकते. या कालावधीत लोकांना नवीन अर्ज करता येणार नाहीत.

### ■ तांत्रिक देखभालीसाठी निर्णय...

### ग्रेकव्हर पासपोर्ट

ग्रेकव्हर पासपोर्ट हा अधिकृत पासपोर्ट आहे. हा पासपोर्ट परदेशात काम करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना आणि अधिकृत असाइनमेंटवर सरकारने खास अधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला दिला जातो.

# UPSC ला आता आधारची मदत

## परीक्षेतील फसवेगिरीला चाप लावणार, नियम बदलणार...

**नवी दिल्ली : संघ लोकसेवा आयोग म्हणजेच यूनियन पब्लिक सर्विस कमिशननं मोठा निर्णय घेतला आहे. यूपीएससीकडून आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये काही उमेदवारांकडून फसवेगिरी केल्याची अनेक उदाहरणं समोर आली होती. त्यामुळं यूपीएससीवर देखील प्रश्नचिन्ह निर्माण झालं होतं. आता परीक्षांमधील फसवेगिरीला चाप लावण्यासाठी यूपीएससीनं मोठं पाऊल टाकलं आहे. संघ लोकसेवा आयोग लवकरच स्पर्धा परीक्षांचं आयोजन करताना आधार प्रमाणीकरणाचा वापर करणार आहे.**

यूपीएससी उमेदवारांच्या परीक्षा आणि नियुक्ती प्रक्रियेसाठी आधार प्रमाणीकरणाचा वापर करणार आहे. सध्या तरी ही प्रक्रिया वैकल्पिक असणार आहे. यूपीएससी कडून यासंदर्भातील नोटिफिकेशन जारी करण्यात आलं आहे. यामध्ये यूआयडीएआयच्या आधार कायद्यातील नियम आणि तरतुदींचं पालन यूपीएससीकडून केलं जाणार असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे.

यूपीएससीनं आधार प्रमाणीकरण वैकल्पिक करण्याचा निर्णय घेतल्यानंतर केंद्र सरकार अशाच प्रकारचा नियम लागू करण्याच्या सूचना स्टाफ सिलेक्शन कमिशनला देखील देण्याची शक्यता आहे.

काही दिवसांपूर्वी एका आयएएस अधिकाऱ्यानं २०२२ च्या नागरी सेवा परीक्षेत नियमांचं उल्लंघन केल्याचं प्रकरण उघडकीस आलंहोतं. त्यानंतर यूपीएससीनं संबंधित अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस देखील जारी केलं होतं. नियमांचं उल्लंघन करुन निश्चित करण्यात आलेल्या प्रयत्नांपेक्षा अधिक वेळा परीक्षा देण्यात आल्याचं त्या प्रकरणात उघडकीस झालं होतं. कागदपत्रांमध्ये देखील फेरफार झाल्याचं प्रकरण समोर आलं होतं.

यूपीएससीनं बुधवारी जारी केलेल्या नोटिफिकेशननुसार त्यांना परीक्षा आणि नियुक्ती प्रक्रियेत आधार प्रमाणीकरणाचा वापर करण्यास परवानगी मिळालेली आहे. यूपीएससीनं परीक्षेसाठी नोंदणी करताना आणि परीक्षेच्या विविध टप्प्यांवर आधार प्रमाणीकरण सध्या वैकल्पिक सुरु केलं आहे. पुढील काही दिवसांमध्ये ते सर्व उमेदवारांसाठी लागू केलं जाऊ शकतं.




### आधार मुळे फसवेगिरीला बसणार चाप ....

आधार प्रमाणीकरणाचा वापर यूपीएससी आणि स्टाफ सिलेक्शन कमिशनकडून परीक्षा आणि भरती प्रक्रियेत विविध टप्प्यांवर केला गेल्यास फसवेगिरी बंद होणार आहे. आधार प्रमाणीकरणामुलं उमेदवारांची ओळख पटवणं यूपीएससीला सोपं होणार आहे. गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या प्रकरणानंतर परीक्षा आयोजनात मोठा बदल केला जाण्याची शक्यता आहे. विशेष बाब म्हणजे यूपीएससी परीक्षेत आधार प्रमाणीकरण केलं गेल्यास एमपीएससीमध्ये देखील आधार कार्ड पडताळणी केली जाऊ शकते.

# छत्रपती शिवरायांची एकदा नव्हे 100 वेळा माफी मागायला कमीपणा वाटणार नाही

**मुंबई – महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा अवघ्या आठ महिन्यांमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमधील राजकोट किल्ल्यावर कोसळल्यानंतर राज्यामध्ये संतापाची लाट पसरली आहे. शिवभक्तांमध्ये संतापाचा कडेलोट झाला असून सर्वत्र शिवरायांचा अपमान झाल्याची भावना व्यक्त होत आहे. झाललेी घटना अतिशय दुर्दैवी असल्याचे ते म्हणाले. या सर्व पार्श्वभूमीवर आज (२९ ऑगस्ट) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. एकदा नव्हे, तर शंभरवेळा शिवरायांची माफी मागायला तयार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, की शिवरायांची एकदा नवे तर शंभरवेळा माफी मागायला तयार आहे.**



### मुख्यमंत्री काय म्हणाले?

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, काल रात्री महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सिंधुदुर्गमध्ये झालेल्या पुतळा दुर्घटनेबाबत चर्चा झाली. ही खरतर खूप वेदनादायी घटना आहे. नौदलाकडू महाराजांचा पुतळा बनवला आला होता. काल झालेल्या बैठकीला सरकारमधील मंत्री तसेच नेव्हीचे अधिकारी आणि पोलीस उपस्थित होते. बैठकीनंतर एका समितीची स्थापना करण्यात आली असून या समितीमध्ये नेव्हीचे अधिकारी, तज्ज्ञ शिल्पकार आणि इतर विषयातील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. लवकरात लवकर ही समिती काम सुरू करेल असे त्यांनी यावेळी सांगितले.

### अजित पवारांनी माफी सुद्धा मागितली आहे

शिंदे पुढे म्हणाले की, तेथील वारे, वातावरण आणि एकूण परिस्थीचा आढावा घेऊन महाराजांचा नवीन मजबूत पुतळा उभा करण्यात येणार आहे. विरोधकांनी यावर राजकारण करणे योग्य नाही. कारण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या महाराजांच्या पायावर मी एकवेळा नाही, तर हजारवेळा नतमस्तक व्हायला तयार आहे. अजित पवारांनी माफी सुद्धा मागितली आहे. शिवाजी महाराज आमच्यासाठी राजकारणाचा विषय नाही. विरोधकांनी सुद्धा यावर राजकारण करू नये. नेव्हीने दुर्घटनास्थळाची पाहणी केली आहे.

■ **शिवाजी महाराजांचा पुतळा अखंड पोकळ होता, समुद्र किनारी असा पुतळा कोण उभं करतं? शर्मिला ठाकरे** (पान २/)

■ **महाराजांच्या गडकिल्ल्यांचा सातबारा राणेंच्या बापाचा नाही, सुषमा अंधारेंचं टीकास्त्र, अटकेची मागणी, फडणवीसही टार्गेट** (पान २/)

■ **राजकोट राड्यातील ४२ कार्यकर्त्यांसह अनोळखी १५० जणांवर गुन्हा दाखल...** (पान २/)

## थोडक्यात घडामोडी

### मुंबई हायकोर्टाचा पोलिसांना सज्जड दम

मुंबई – मिसिंगची तक्रार न नोंदवणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्याचे आदेश मुंबई हायकोर्टानं दिलेत... कोर्टानं वरीष्ठ पोलीस अधिऱ्यांना तशा सूचना दिल्यात.... तपास करावा लागेल म्हणून काही पोलीस मिसिंगची तक्रार नोंदवून घेत नाहीत.. असं निरीक्षण कोर्टानं नोंदवलंय.. पोलीस अधिकारी नुसते पोलीस ठाण्यात बसून असतात.. त्यामुळे प्रलंबित गुन्ह्यांचा आलेख वाढत असतो, असे खडेबोलही न्यायायलानं पोलिसांना सुनावलेत... कफ परेड येथील एका मिसिंग तक्रारीवरुन दाखल केलेल्या याचिकेवर हायकोर्टात सुनावणी झाली.. त्यावेळी कोर्टानं मुंबई पोलिसांची चांगलीच कानउघडणी केलीये..

### शिवाजी पार्क मैदानात रमाकांत आचरेकरांचा पुतळा उभारण्याचा निर्णय

मुबई: दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानात (पार्क) सर रमाकांत आचरेकर यांचे स्मृतिशिल्प उभारले जाणार आहे. राज्य सरकारकडून स्मृतीशिल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. शिवाजी पार्क परिसरातील गेट क्र. ५ जवळ रमाकांत आचरेकरांचे स्मृतिशिल्प उभारले

■ **सचिन तेंडुलकर भावूक, राज्य सरकारचे मानले आभार**

जाणार आहे. रमाकांत आचरेकर यांचे स्मृतिशिल्प गेट क्र. ५ जवळील मोकळ्या जागेतील सहा फुटांच्या लांबी, रुंदी आणि उंचीचे असणार आहे. आवश्यक परवानग्या, वेळेत स्मृतीशिल्प उभारले जाईल यासंदर्भात मुंबई पालिकेकडे जबाबदारी देण्यात आली आहे. स्मृतिशिल्प उभारणीनंतर देखभाल आणि दुरुस्ती करण्याची जबाबदारी आणि लागणारा निधीची तरतुदीची जबाबदारी बी.व्ही. कामथ मेमोरीअल क्रिकेट क्लबची राहणार आहे.

# आता बोरीवलीहून थेट मडगाव, नवीन एक्स्प्रेस सुरू

**मुंबई – गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्यांसाठी चाकरमान्यांची लगबग सुरू आहे. या काळात रेल्वेचे कन्फर्म तिकीट मिळणे खूप कठिण असते. मात्र आता रेल्वे प्रशासनाने चाकरमान्यांना मोठा दिलासा दिला आहे. २९ ऑगस्टपासून मडगाव–वांद्रे टर्मिनस–मडगाव ही एक्स्प्रेस सुरू करण्यात आली आहे. बोरीवली रेल्वे स्थानकातून या गाडीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. पश्चिम रेल्वेवरुन ही गाडी धावणार असल्याने वसई–विरार, बोरीवलीच्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.**

कोकणात जाण्यासाठी पश्चिम रेल्वेवरील प्रवाशांना सीएसएमटी किंवा एलटीटीवरुन ट्रेन पकडावी लागते. त्यामुळं बोरीवली स्थानकातून कोकणात जाण्यासाठी ट्रेन सोडण्यात याव्या, अशी मागणी होत होती. खासदार पियुष गोयल यांनीही लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत बोरीवलीहून वसईमार्गे कोकणात (पान २ वर)




### गोयल यांची वचनपूर्ती....

लोकसभा निवडणुकीच्या वेळी मी जनतेला आश्वासन दिले होते की, लवकरच बोरिवली ते कोकणात थेट रेल्वेची सोय केली जाईल. आज ही रेल्वे सेवा सुरू करताना अतिशय आनंद होत आहे. यावेळी कुली बंधू आणि प्रवाशांचीही भेट घेतली. उत्तर मुंबई हे वर्षानुवर्षे कोकणी लोकांचे घर आहे जे दरवर्षी विविध सण आणि कार्यक्रमांसाठी घरी जातात. कोणतीही थेट गाडी नसल्यामुळे त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. आता ही ट्रेन सुरू झाल्याने त्यांना कोणत्याही गैरसोयीशिवाय वेळ आणि पैसा वाचविता येणार आहे.

### कशी असेल एक्स्प्रेसची वेळ

वांद्रे टर्मिनसवरुन ही एक्स्प्रेस सकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी सुटणार आहे. त्यानंतर ती गोव्यात मडगावमध्ये रात्री १० वाजता पोहोचणार आहे. मडगावहून पुन्हा वांद्रे टर्मिनससाठी ही गाडी ७ वाजून ४० मिनिटांनी सुटणार असून रात्री ११ वाजून ४० मिनिटांनी पोहोचेल. या गाडीला २० डबे असून त्यात सेकंड स्लीपर ८ डबे, थ्री टायर एसीचे ३ डबे, थ्री टायर एसी इकॉनॉमीचे २ डबे, टू टायर एसीचा १ डबा, जनरल ४ डबे, एसएलआर–१, पँट्री कार–१, जनरेटर कार–१ यांचा समावेश आहे. ही गाडी आठवड्यातून दोन दिवस म्हणजे मंगळवारी आणि गुरुवारी मडगाव येथून व बुधवारी आणि शुक्रवारी वांद्रे येथून सुटणार आहे.

### कुठे असेल थांबा

वांद्रे मडगाव एक्स्प्रेसला बोरिवली, वसई, भिवंडी, पनवेल, रोहा, वीर, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, सिंधुदुर्ग, सावंतवाडी, थिविम आणि करमाळी या रेल्वे स्थानकांवर थांबा असेल.

# सरपंचाचे मानधन वाढणार

## गिरीश महाजन यांची मोठी गॅरेंटी

▌ सरपंच परिषदेच्या आंदोलनाला यश

मुंबई – गावचा कारभारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरपंचांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्यातील सर्व सरपंचाच्या मानधनात वाढ करण्यात येणार असल्याची ग्वाही ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे. ग्रामपंचायतीच्या संदर्भातील विविध मागण्यांसाठी गेल्या काही दिवसापासून अखिल भारतीय संरपंच परिषदेच्यावतीनं मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन सुरु होते. त्या आंदोलनाला यश आलं असं म्हणावं लागेल.

सरपंचाचे मानधन वाढावं, सरपंचांना १५ हजार रुपये, उपसरपंचाला १० हजार रुपये तर ग्रामपंचायत सदस्याला ३ हजार रुपयांचे मानध मिळावे, ग्रामपंचायतीला जास्तीत जास्त निधी मिळावा यांसारख्या विविध मागण्या करत अखिल भारतीय संरपंच परिषदेच्या वतीने आंदोलन सुरु होते. यानंतर सरकारकडून मंत्री गिरीश महाजन यांनी सरपंच्यांच्या शिष्टमंडळाशी संवाद साधत आंदोलनाला बसलेल्या सरपंच्याच्या सर्व मागण्या मान्य केल्या. महाजन यांच्या मध्यस्थीनंतर सरपंचांचे आंदोलन स्थगित करण्यात आलं आहे. सरपंचांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव आठवड्यात मान्य करणार असल्याची माहिती मंत्री महाजन यांनी दिलीय.

### सरपंचाच्या मागण्या नेमक्या काय?

- सरपंचांना १५ हजार रुपये, उपसरपंचाला १० हजार रुपये तर ग्रामपंचायत सदस्याला ३ हजार रुपयांचे मानध मिळावे
- मुंबईत सरपंच भवनची स्थापना करावी
- ग्रामपंचायत संदर्भातील सर्व घटकांना विमा, पेन्शन, निश्चित वेतन लागू करावे
- ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी पद एकत्रित करुन पंचायत विकास अधिकारी म्हणावे
- ग्रामरोजगार सेवकाची नेमणूक पूर्णवेळ करुन वेतनिश्चिती करावी
- ग्रामपंचायतींना स्वायत्त संस्थेचा अधिकार देऊन विकासकामे करण्याचा अधिकार द्यावा
- संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधात आणावे
- यावलकर समितीचा अहवाल लागू करावा
- संगणक परिचालकांचा भार ग्रामपंचायतीऐवजी शासनाने उचलावा

# शासकीय रुग्णालयात खाटांची संख्या तीन पटीने वाढणार

**ठाणे – खासगी रुग्णालयात उपचार घेणे गरिबांच्या आवाक्याबाहेर असते. अशा रुग्णांना शासकीय रुग्णालयाचा मोठा आधार मिळतो. ही बाब लक्षात घेता ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाने आरोग्य व्यवस्था आणखी बळकट करण्याचे पाऊल उचलले आहे. हे रुग्णालय सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल होण्याबरोबरच जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालयांच्या खाटांची ९७६ वरून १,१८४ होणार आहे. राज्य सरकारने याला मंजुरी दिली आहे. त्यामुळे जिल्ह्यात तीन पटीने खाटांची संख्या ३,३३० इतकी वाढणार आहे.**

जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना चांगले उपचार मिळावेत, यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासनाने कंबर कसली आहे. सिव्हिल रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आदी सरकारी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे; (पान २ वर)

### राज्य सरकारची मंजुरी



जिल्ह्यात लोकसंख्या वाढत असून, काही वेळा रुग्णांना मुंबईत उपचारासाठी न्यावे लागते; परंतु जिल्ह्यात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमुळे सामान्य रुग्णांना मोठा आधार मिळणार आहे. अत्याधुनिक यंत्रणांनी सुसज्ज असणाऱ्या हॉस्पिटलमध्ये अवघड जोखमीच्या खर्चिक शस्त्रक्रिया करणे सोयीचे होणार आहेच; पण त्याचबरोबर जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयात बेडची संख्या वाढल्याने रुग्णांची धावपळ कमी होण्यास मदत मिळेल.

– डॉ. कैलास पवार, जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे

### डोळखांब आरोग्य केंद्र होणार ग्रामीण रुग्णालय

ठाणे जिल्हा शहरी ग्रामीण अणि दुर्गम आदिवासी भागात विभागला आहे. त्यामुळे जिल्ह्यात बेडची संख्या जास्तीत जास्त वाढवण्यासाठी प्रस्ताव पाठवले आहेत. पंडित भीमसेन जोशी मिरा भाईदर रुग्णालयात २००, अंबाडी फाटा ग्रामीण रुग्णालय पडघा, कसारा, किन्हवली, मंगरूळ, गोवेली, खर्डी टोकवडे आदी रुग्णालयात बेडचे नवीन प्रस्ताव पाठवले आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र डोळखांब ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाला मंजुरी मिळाली आहे.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे वाढते प्रमाण

भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसंदर्भात नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (एनसीआरबी) च्या डेटावर आधारित निराशाजनक आकडेवारी समोर आली आहे. या नवीन अहवालानुसार, विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा दर वाढत आहे. ही समस्या भविष्यात गंभीर रूप धारण करण्याची शक्यता आहे. लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षाही विद्यार्थी आत्महत्येचा दर अधिक असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (एनसीआरबी) च्या डेटावर आधारित स्टुडंट सुसाईड : ॲन एपीडेमिक स्वीपिंग इंडिया अहवाल नुकताच वार्षिक आयसी ३ परिषद आणि एक्सपो २०२४ मध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. या अहवालात नमूद असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी चिंतनीय आहे. यावर केंद्र सरकारने ठोस उपाययोजना करावी अशी अपेक्षा आहे. सदर अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, गत वर्षामध्ये एकूण आत्महत्येच्या प्रमाणात दोन टक्क्यांनी वाढ झाली आहे. तर याच कालावधीत विद्यार्थी आत्महत्येचे प्रमाण चार टक्क्यांनी वाढले आहे. अहवालानुसार, २०२२ मध्ये भारतात १३,०४४ विद्यार्थी आत्महत्या झाल्या. २०२१ मध्ये हा आकडा १३,०८९ होता, त्यामुळे २०२२ मध्ये थोड्या प्रमाणात घट पाहायला मिळाली होती. ही घट असूनही, एकूण आत्महत्येचे प्रमाण (विद्यार्थी आणि सामान्य लोक दोन्हींचा समवेश) २०२१ मध्ये १,६४,०३३ होते, जे २०२२ पर्यंत १,७०,९२४ पर्यंत वाढले आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांनी लोकसंख्या वाढीचा दर आणि एकूण आत्महत्येचा दर या दोन्हींना मागे टाकले आहे. गेल्या दशकात, ०-२४ वर्षे वयोगटातील लोकसंख्या ५८२ दशलक्ष वरून ५८१ दशलक्षपर्यंत कमी झाली आहे, तर विद्यार्थी आत्महत्यांची संख्या ६,६५४ वरून १३,०४४ पर्यंत वाढली आहे, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. ही वाढ चिंताजनक आहे. कारण, गेल्या २० वर्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण एकूण आत्महत्या दराच्या दुप्पट वेगाने वाढत आहे. एकूण आत्महत्येच्या घटनांमध्ये ७.६ टक्के विद्यार्थी आत्महत्येच्या घटनांचा समावेश आहे. हा दर पगारदार कामगार, शेतकरी, बेरोजगार तरुण आणि स्वयंरोजगार असलेल्या इतर अनेक व्यवसायांच्या तुलनेतील आहे. अहवालानुसार, विद्यार्थ्यांच्या आत्महत्येमध्ये महाराष्ट्र या आकडेवारीत आघाडीवर आहे. २०२२ मध्ये, महाराष्ट्र (१,७६४ आत्महत्या - १४ टक्के), तामिळनाडू (१,४१६ - ११ टक्के), आणि मध्य प्रदेश (१,३४० - १० टक्के) या तीन राज्यांमध्ये सर्वाधिक विद्यार्थी आत्महत्यांची नोंद करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ आठ टक्क्यांसह उत्तर प्रदेश आणि सहा टक्क्यांसह झारखंडचा क्रमांक येतो. दक्षिणी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकत्रितपणे २९ टक्के प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. तर पीटीआयनुसार, कोटा सारखे कोचिंग हब असणारे उच्च दर्जाच्या शैक्षणिक वातावरणासाठी ओळखले जाणारे राजस्थान १० व्या क्रमांकावर आहे. २०२२ मध्ये एकूण विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांपैकी ५३ टक्के आत्महत्या करणारे पुरुष विद्यार्थी होते. २०२१ ते २०२२ दरम्यान, पुरुष विद्यार्थ्यांच्या आत्महत्या सहा टक्क्यांनी कमी झाल्या आहेत, तर महिला विद्यार्थ्यांच्या आत्महत्या सात टक्क्यांनी वाढल्या आहेत, असे आयसी ३ संस्थेने संकलित केलेल्या अहवालात नमूद केले आहे. याशिवाय, अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, गेल्या दशकभरात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, एकूण पुरुषांच्या आत्महत्यांमध्ये ५० टक्के आणि महिलांच्या आत्महत्यांमध्ये ६१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. एनसीआरबी द्वारे संकलित केलेला डेटा पोलीस-रेकॉर्डमधील प्रथम माहिती अहवालांवर (एफआयआर) आधारित आहे. परंतु, ही संख्या पोलीस रेकॉर्डमधील डेटापेक्षाही अधिक असल्याचे सांगितले जाते. कारण, अनेक प्रकरणांची पोलीस स्थानकात नोंद केली जात नाही. सामाजिक कलंक आणि आत्महत्येविरोधातील काही कायदे यासाठी कारणीभूत असल्याचे सांगितले जाते. शिवाय, मजबूत डेटा संकलन प्रणाली नसल्यामुळे या घटनांची नोंद होत नाही. विशेषत: ग्रामीण भागात, जेथे तक्रार नोंदवणे शहरी क्षेत्रांच्या तुलनेत कमी सुसंगत आहे, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, पोलीस डेटातील अनेक प्रकरणांमध्ये भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येशी संबंधित अनेक महत्त्वाच्या घटकांचाही उल्लेख करण्यात आला आहे. त्यात शैक्षणिक तणाव, केंद्रित लक्ष्यापर्यंत पोहोचण्यात अपयश येणे, रॅगिंग आणि गुंडगिरी, भेदभाव आणि आर्थिक ताण, यांसारख्या गोष्टींचा समावेश आहे. आयसी ३ चे संस्थापक गणेश कोहली यांनी म्हटले आहे की, हा अहवाल आपल्या शिक्षण संस्थांमधील मानसिक आरोग्याच्या आव्हानांना सामोरे जाण्याची तातडीने गरज असल्याचे निदर्शनास आणून देतो. प्रत्येक संस्थेमध्ये एक पद्धतशीर, सर्वसमावेशक आणि मजबूत महाविद्यालयीन समुपदेशन प्रणाली तयार करणे आवश्यक आहे, तसेच अभ्यासक्रमातही याचा समावेश करणे आवश्यक आहे. वाढत्या संकटाला तोंड देण्यासाठी, मानसिक आरोग्याला चालना देणे, शिक्षणाचा दर्जा सुधारणे आणि पुरेशा सहाय्य सेवा प्रदान करणे यासारख्या सर्वसमावेशक उपायांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या आत्महत्या प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज आहे.

## ठाणे येथे क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेच्या विरोधात एकता संघ गाव बचाव कृती समितीचे आंदोलन

■ ठाण्यात क्लस्टरला नागरिकांचा विरोध

■ मानपाडा, आझादनगर, मनोरमा नगरमधील रहिवाशांत नाराजी; सर्व्हे ला आडकाठी

ठाणे : घोडबंदर भागातील १०० टक्के झोपडपट्टी परिसर असलेल्या मानपाडा, आझादनगर आणि मनोरमा नगर या भागाचा विकास क्लस्टर योजनेत करण्याचा घाट ठाणे महापालिकेने घातला असून, त्याला स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध केला. 'बायकॉट क्लस्टर, झोपडपट्टी बचाव' असा नारा देत रहिवाशांनी महापालिकेच्या विरोधात दंड थोपटले आहेत.

ठाणे येथे क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेच्या विरोधात एकता संघ गाव बचाव कृती समिती मानपाडा, मनोरमा नगर, आझाद नगर समिती च्या मार्गदर्शनाखाली आंदोलन पुकारले आहे. रहिवाश्यांना आपल्या घरांची चिंता वाटत आहे. त्यांना बेघर होण्याची भीती सतावत आहे. ही क्लस्टर योजना नेमकी काय महापालिका प्रशासन काही बोलत नाही नंबरींग करून जात आहे. आमची घरे बिल्डर च्या घशात घालण्याचा डाव महापालिका प्रशासनाने आखला आहे असं रहिवाश्यांना वाटतं आहे म्हणून हजारो नागरिक रस्त्यावर येऊन आपल्या तीव्र भावना व्यक्त करत आहेत. रहिवाश्यांची एकच मागणी आहे महापालिकाने आता सार्वजनिक बैठक घेऊन आमच्या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजे अता आमचे लोकप्रतिनिधी ही काही बोलत नाहीत उघड भूमिका घेत नाहीत त्यांचा या योजनेला पाठिंबा आहे का विरोध आहे काही सांगत नाहीत.

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून ४५ नागरी पुनरुत्थान आराखडे तयार केले होते. पहिल्या टप्प्यात किसननगर भागात सिडकोच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविण्यात येत असून, याठिकाणी प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.




### बायोमेट्रिक, जीआयएस सर्व्हे सुरु

■ मानपाडा, आझादनगर आणि मनोरमा नगर हा भाग १०० टक्के झोपडपट्टीने व्यापला आहे. या ठिकाणी रहिवाशांची छोटी घरे असल्याने तळ अधिक एक मजला अशी घरे वाढवली आहेत. कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता महापालिकेच्या माध्यमातून या ठिकाणी बायोमेट्रिक आणि जीआयएस सर्व्हे सुरु केला आहे. याची माहिती रहिवाशांना होताच, त्यांनी योजनेला विरोध केला.

■ मागील आठवड्यात या तीनही भागातील रहिवाशांनी रस्त्यावर उतरुन या विरोधात आवाज उठविला. त्यामुळे आता प्रशासनाला जाग येणार का, असे रहिवाशांचे म्हणणे आहे. क्लस्टर योजना शहरातील अनधिकृत व धोकादायक इमारतींसाठी आणली आहे. झोपडपट्टीचा भाग क्लस्टर योजनेत समाविष्ट केला जात आहे.

■ धोकादायक इमारतींचा विकास करीत असताना लगत असलेल्या एकूण झोपडपट्टीच्या २५ टक्के भाग क्लस्टरमध्ये समाविष्ट करता येऊ शकतो. मात्र ज्या ठिकाणी १०० टक्के झोपडपट्टी आहे, त्याठिकाणी क्लस्टर राबविता येऊ शकत नाही, अशी तरतूद आहे. मानपाडा, आझादनगर, मनोरमा नगर आदी भागात धोकादायक इमारती नसताना महापालिका प्रशासनाकडून क्लस्टर योजना रेटण्याचा घातला जाणारा घाट धक्कादायक आहे.

## आता बोरीवलीहून थेट मडगाव, नवीन एक्स्प्रेस सुरू

(पान १ वरून) गाड्या सोडाव्यात, असं म्हटलं होतं. त्यावर त्यांनी सकारात्मक प्रतिसादही दिला होता. गणेशोत्सवाला अवघा एक आठवडा उरला आहे. त्याआधीच बोरीवलीहून वसईमार्गे गाडी सोडण्यात आली. आठवड्यातून दोन वेळा ही गाडी धावणार आहे. प्रथमच वसई-पनवेल या कॉरीडॉरचा वापर करुन वांद्रे-टर्मिनस ते मडगाव एक्स्प्रेस सुरू करण्यात आली आहे.

## शासकीय रुग्णालयात खाटांची संख्या तीन पटीने वाढणार

(पान १ वरून) मात्र काही वेळा रुग्णाला ॲडमिट करताना खाटा उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे रुग्णाला ॲडमिट करून घेताना रुग्णालयाची तारेवरची कसरत होते; मात्र रुग्णांची आबाळ होणार नाही याची काळजी आरोग्य विभागाने घेतली आहे. जिल्ह्यात सध्या ९७६ खाटा उपलब्ध असून, यामध्ये १,१८४ नवीन खाटांना मंजुरी दिल्याची माहिती जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली. ठाणे जिल्हा रुग्णालयाचे रूपांतर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये होत आहे. सध्या रुग्णालयाची बेडची संख्या ३३६ आहे, तर नवीन होणाऱ्या सुपर स्पेशालिटी खाटांची संख्या ९०० होणार आहे. इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात १०० बेड आहेत. आणखी २०० खाटांना मंजुरी मिळाली आहे. याचप्रमाणे उपजिल्हा रुग्णालय अंबरनाथ येथे आता ५० वेडची सोय असून यामध्ये आणखी १०० बेडला मान्यता मिळाली आहे. उपजिल्हा रुग्णालय बदलापूरमध्ये ३० बेड आहेत. नवीन ५० खाटांना मान्यता मिळाली आहे. तसेच, नवीन २०० बेडचा श्रेणीवर्धन प्रस्ताव अणि २०० खाटांचा महिला व बालरुग्णालय प्रस्ताव पाठवला आहे.

## सर्वांसाठी परवडणारी घरं बनवणार, देवेंद्र फडणवीसांचा शब्द, म्हाडाची घरं १० ते १५ लाखांनी स्वस्त!

मुंबई : मुंबईत घर घेण्याचं प्रत्येकाचंच स्वप्न असतं. पण, सध्या म्हाडाच्या घरांच्या किमतीही गगनाला भिडल्या आहेत. म्हाडाच्या लॉटरीतील घरांच्या किमती एवढ्या असतील, तर सर्वसामान्यांचं घर घेण्याचं स्वप्न कसं पूर्ण होणार? असा प्रश्न चर्चेत होता. अशातच आता, म्हाडाच्या मुंबईतील घरांच्या किमतींत १० ते २५ टक्क्यांची घट करण्यात आली, तर ६२ लाखांचं घर ५० लाखांत, ३९ लाखांचे घर २९ लाखांत मिळणार आहे. तसेच, खासगी विकासकांकडून निर्माण केलेल्या ३७० घरांची किंमत कमी होणार असल्याची घोषणा गृहनिर्माणमंत्री अतुल सावेंनी केली आहे. तसेच, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही म्हाडाच्या घरांच्या किमतींत घट करत असल्याची घोषणा केली आहे.

## महापालिका मुख्यालयात मुख्यमंत्री; माझी लाडकी बहीण आढावा बैठक

पनवेल - पनवेल महापालिका कार्यक्षेत्र तसेच पनवेल तालुक्यामध्ये सुरू असलेल्या मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रभावी अमंलबजावणीबाबत पनवेल विधानसभा मतदार संघ क्षेत्र निहाय समितीची आढावा बैठक आज पनवेल महापालिका मुख्यालयात आज मा.आमदार श्री. प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आज घेण्यात आली.

यावेळी आयुक्त श्री. मंगेश चितळे, उपायुक्त संतोष वारूळे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी ,सदस्य सचिव तहसिलदार विजय पाटील, नायब तहसिलदार राजश्री जोगी ,सदस्य मेघा दमडे, प्रज्ञा चव्हाण, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, शिवसेना पदाधिकारी मंगेश अडसूळ, महापालिका समाजविकास अधिकारी स्वप्नाली चौधरी, डेनयूलएम व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात अभियंता गजानन देशमुख, महसूल विभाग अधिकारी उपस्थित होते.



यावेळी मा.आमदार श्री. प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेची अमंलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी उपस्थितांकडून जाणून घेऊन त्यावर चर्चा केली. यावेळी काही महिलांचे बँक खाते जास्त दिवसापासून वापरात नसल्याने, आधार कार्डशी लिंक नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या तक्रारींचे निवारण करण्यासाठी बँकांना मेलद्वारे सूचित करून लवकरात लवकर ही समस्या दूर करण्याबाबत उपस्थितांना सूचना दिल्या.

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्र व पनवेल तालुक्यात आज पर्यंत एकुण १ लाख ५ हजार महिलांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. कागदपत्राच्या अपुर्ततेमुळे ज्या महिलांचे अर्ज नामंजूर झाले होते. त्यांच्याशी फोनच्या माध्यमातून संवाद साधून त्यांचे अर्ज मंजूर करण्यात आल्याची माहिती आयुक्त मंगेश चितळे यांनी दिली.

यावेळी आदिवासी पाड्यावरील महिलांना मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ देताना येणाऱ्या अडचणी आमदार महोदयांनी समजून घेऊन, या अडचणी सोडविण्यावरती उपस्थितांशी चर्चा करण्यात आली.

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेबरोबर महापालिका कार्यक्षेत्र व पनवेल तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ योजना व मुख्यमंत्री वयोश्री योजनेचाही आढावा यावेळी घेण्यात आला.

उपायुक्त वारूळे यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महापालिका कार्यक्षेत्रात प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती दिली. या योजनेअंतर्गत महापालिकेतील विविध विभागात ५२ युवकांना संधी दिल्याचे सांगितले. तसेच महापालिका कार्यक्षेत्रातील एमआयडीसी, तसेच २० पेक्षा जास्त मनुष्यबळ असलेल्या व तीनवर्षापेक्षा जास्त वर्षापासून काम करत असलेल्या विविध कंपन्या, बँका, बांधकाम क्षेत्रांमध्ये प्रशिक्षणासाठी संधी उपलब्ध करून देण्याबाबत आस्थापनांशी संवाद सुरू असल्याची माहिती दिली. तसेच मुख्यमंत्री तीर्थ योजनेचे अर्ज जेष्ठ नागरिकांकडून मागविण्यात येत असल्याचे सांगितले.

तसेच मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा आढावा घेताना मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी आजपर्यंत ८ हजार ६५५ नागरिकांनी या योजनेंतर्गत अर्ज भरल्याची माहिती दिली. आशा सेविकांच्या मार्फत जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत ही योजना पोहचविली जात असल्याची माहिती दिली.

मुख्यमंत्री तीर्थ योजना व मुख्यमंत्री वयोश्री योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी अशा सूचना मा. आमदार श्री. प्रशांत ठाकूर यांनी दिल्या.

## छत्रपती शिवरायांची एकदा नव्हे १०० वेळा माफी मागायला कमीपणा वाटणार नाही

### (पान १ वरून) राजकोट राड्यातील ४२ कार्यकर्त्यांसह अनोळखी १५० जणांवर गुन्हा दाखल

मालवण - राजकोट येथे काल झालेल्या राड्याप्रकरणी मालवण पोलिसांनी राणे समर्थक तसेच ठाकरे गटातील दंगा करणाऱ्या ४२ जणांसह अनोळखी दीडशे जणांवर गुन्हा दाखल केला आहे. अशी माहिती पोलीस निरीक्षक प्रवीण कोल्हे यांनी दिली. राजकोट किल्ला येथील कोसळलेल्या पुतळ्याच्या पाहणी दरम्यान काल दुपारी राणे समर्थक व ठाकरे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते एकमेकांना भिडले. यात संभाजी पाटील, मेहेक परब हे पोलीस कर्मचारीही जखमी झाले. त्याचबरोबर अनेक कार्यकर्ते ही जखमी झाले. त्यामुळे या राड्याप्रकरणी गर्दी, मारामारी, घोषणाबाजी, शासकीय कामात अडथळा, लोकसेवकांना त्यांच्या कामात धाक दाखवून परावृत्त करणे, दुखापत करणे, जिल्ह्यात सुरू असलेल्या मनाई आदेशाचा भंग करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे अशा विविध कलमानुसार दोन्ही गटातील दंगा करणाऱ्या ४२ जणांसह अनोळखी १५० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रवीण कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक एस. एस. खाडे हे अधिक तपास करत आहेत.

### शिवाजी महाराजांचा पुतळा अखंड पोकळ होता, समुद्र किनारी असा पुतळा कोण उभं करतं? शर्मिला ठाकरेंचा संताप

प्रत्येक गोष्टीमध्ये भ्रष्टाचार करता, निदान छत्रपतींना तरी सोडा, असं शर्मिला ठाकरे म्हणाल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा बनवण्यात आलेला पुतळा आतून पोकळच होता. पोकळ पुतळा कोणी समुद्र किनारी उभं करत का? महाराजांनी बांधलेले गड-किल्ले आजही तसेच आहेत आणि ८ महिन्यांमध्ये यांनी बांधलेला पुतळा कोसळला, असं शर्मिला ठाकरे यांनी म्हटलं आहे. पडलेला पुतळा जो दाखवत आहेत, तो अखंड पोकळ पुतळा होता. असा पोकळ पुतळा समुद्र किनारी कोण उभं करत? असा सवालही शर्मिला ठाकरे यांनी केला आहे.

### महाराजांच्या गडकिल्ल्यांचा सातबारा राणेंच्या बापाचा नाही, सुषमा अंधारेंचं टीकास्त्र, अटकेची मागणी, फडणवीसही टार्गेट

- पुणे: पुण्यात शिवसेना ठाकरे गटाकडून आंदोलन करण्यात आले. बुधवारी मालवण येथे ठाकरे आणि राणेंमध्ये जो राडा झाला. यानंतर राणे यांनी धमकी दिली. त्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष पुण्यात आंदोलन केले. संपूर्ण घटनेबाबत सरकारचा निषेध आणि राणेंना जोडे मारो आंदोलन शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने बालगंधर्व रंगमंदिर चौकात करण्यात आले. यावेळी जमलेल्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली, रस्त्याच्या मधोमध बसून हे आंदोलन करण्यात येत आहे. यावेळी नारायण राणेंना अटक करा अशी मागणीही करण्यात आली आहे. महाराजांच्या गडकिल्ल्यांचा सातबारा राणेंच्या बापाचा नाही असं म्हणत ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी राणेंवर टीकास्त्र सोडलं आहे.

### पुतळा बनवणाऱ्या आपटेला आम्ही आपटणार, राणेंचा सांगलीतून इशारा; इस्लामपूरचंही केलंय नामांतर

सुषमा अंधारे यांनी नितेश राणे आणि पुतळा बनवणाऱ्या आपटेचा फोटो दाखवला. आता, नितेश राणे यांनी पलटवार करत, आपटेला आम्ही आपटणार असल्याचं म्हटलं आहे. सिंधुदुर्गमधील किल्ल्यावर उभारलेला शिवाजी महाराजांचा पुतळा बनविणाऱ्या आपटे नावाच्या व्यक्तीला आम्ही सोडणार नाही, आम्ही त्याला नक्की आपटणार, असे म्हणत नितेश राणेंनी पुतळा बनवणाऱ्या ठेकेदार आपटेला इशारा दिल आहे. विशाळगडावर हिरव्या चादरी टाकत आहेत, महाराजांच्या गड किल्ल्यांची काय अवस्था करून ठेवली आहे. सिंधुदुर्गकडे जाणाऱ्या नेत्यांना विशाळगडवरील जिहाद्यांचे आतीक्रमने दिसली नाहीत का, असा सवालही नितेश रणेंनी विचारला आहे. नितेश राणे यांची आज सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे रॅली काढण्यात आली आहे, त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना इस्लामपूरचं नाव बदलणार असल्याचं म्हटलं.

## २७ गावांमधील पथदिव्यांचे काम घेण्यासाठी राजकीय ठेकेदारांमध्ये चढाओढ

कल्याण : कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील २७ गावांमधील पथदिव्यांची २६ कोटीची कामे घेण्यासाठी राजकीय आशीर्वाद असलेल्या ठेकेदारांमध्ये जोरदार चढाओढ लागली आहे. विधानसभा आणि महापालिका निवडणुकांच्या तोंडावर ही कामे होणार असल्याने आपल्याच ठेकेदाराला हे काम मिळावे म्हणून काही राजकीय मंडळींकडून पालिका अधिकाऱ्यांवर जोरदार दबाव आणला जात असल्याची विश्वसनीय माहिती आहे. २७ गावांमध्ये अनेक वर्षानंतर प्रथमच नवीन पथदिवे बसविण्याची कामे होणार आहेत. या कामांच्या माध्यमातून या भागात मत बँक तयार करण्याचा काही राजकीय मंडळींचा इरादा आहे. त्यामुळे ही पथदिव्यांची कामे करण्यास घेऊन त्या माध्यमातून प्रत्येक गावात आपला संपर्क वाढवून आपली मत बँक या भागात कशी तयार करता येतील या दृष्टीने काही राजकीय मंडळी हे काम आपल्याच ठेकेदाराला मिळावे यासाठी जोरदार प्रयत्नशील आहेत.

ही कामे दर्जेदार पध्दतीची होण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील नामवंत विद्युत ठेकेदार या स्पर्धेत उतरणे आवश्यक होते. परंतु, या निविदा प्रक्रियेतील अटीशर्ती काही ठराविक ठेकेदारांच्या हिताच्या करण्यात आल्याची चर्चा काही विद्युत ठेकेदारांमध्ये आहेत. ठाण्यात हजारो कोटीची पथदिव्यांची कामे करणाऱ्या एका नामवंत विद्युत कंपनीला या स्पर्धे तून बाहेर काढण्यात (मेक) आले आहे. ठाणे, नवी मुंबई परिसरातील एका वजनदार राजकीय पुढाऱ्याने आपल्या समर्थकाच्या माध्यमातून २७ गावातील पथदिव्यांची निविदा भरून हे काम आपल्यालाच मिळावे यासाठी वरिष्ठ स्तरावरून वजनदार राजकीय दबाव आणण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

पथदिव्यांच्या कामासाठी सुमारे चार विद्युत ठेकेदारांनी निविदा भरल्या आहेत. यामधील बहुतांशी निविदा या राजकीय पाठबळ असणाऱ्या ठेकेदारांच्या असल्याने स्थानिक विद्युत ठेकेदारांनी या कामांकडे पाठ फिरवली असल्याचे समजते. काही ठेकेदारांनी या वृत्ताला दुजोरा दिला. पालिका अधिकारी मात्र या निविदा प्रक्रियेमुळे गोंधळले आहेत. स्पर्धेतील ठेकेदारांना कामे मिळाली नाहीत तर तेथून टिकेची झोड आणि नामवंत विद्युत कंपन्या स्पर्धेबाहेर ठेवल्याने तेथूनही टीका होण्याची भीती अधिकाऱ्यांना आहे.

अनेक वर्षानंतर २७ गाव हद्दीत होणारी पथदिव्यांची कामे योग्यरितीने केली नाहीत तर ठेकेदारांना गावकऱ्यांचा रोषाला सामोरे जावे लागेल. या भीतीने हे काम चांगल्या ठेकेदाराला मिळेल यादृष्टीने पालिकेचे प्रयत्न सुरू आहेत.

> २७ गावांमधील पथदिव्यांची कामे करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित कामे सुरू केली जातील. दर्जेदार पध्दतीने ही कामे होतील याकडे पालिकेचा कटाक्ष असेल.
>
> **- प्रशांत भागवत, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग.**

### शिळफाट्याचे पथदिवे

गेल्या दीड वर्षाच्या कालावधीत शिळफाटा रस्त्यावर बसविण्यात आलेले नवेकोरे पथदिवे मेट्रोच्या कामासाठी रस्त्यामधून काढण्यात आले आहेत. पत्रीपूल ते पलावा चौकापर्यंत हे पथदिवे आहेत. या पथदिव्यांचे होणार काय, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. रस्ता एमएसआरडीसीचा असल्याने या पथदिव्यांवर त्यांचे नियंत्रण आहे, असे पालिकेकडून सांगण्यात येते. हे पथदिवे पालिकेने एमएसआरडीकडून घेऊन उपयोगिता असलेल्या भागात लावण्याची मागणी नागरिक करत आहेत. हे पथदिव्यांचे काम एका वजनदार राजकीय व्यक्तिच्या आशीर्वादाने करण्यात आले होते.

## १ सप्टेंबर पासून ताज्या म्हशीच्या दुधाचे दर 'दोन' रूपयांनी वाढणार

**Mumbai Milk Producers Association कडून म्हशीच्या दुधाच्या किंमतींमध्ये वाढ जाहीर केली आहे. १ सप्टेंबर पासून ताज्या म्हशीच्या दुधाचे दर दोन रूपयांनी वाढणार आहेत. MMPA च्या जनरल बॉडी मिटिंग मध्ये हा दूध दरवाढीचा निर्णय एकमताने झाला आहे. त्यामुळे आता अन्य दूधाच्या आणि दुग्धजन्य पदार्थांच्या दरवाढीची देखील शक्यता आहे. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात गणपतींचं आगमन होणार आहे. त्यापाठोपाठ नवरात्र, दसरा, दिवाळी असणार आहे.**



MMPA च्या Executive Committee member C.K. Singh यांनी दिलेल्या माहितीनुसार, म्हशीच्या दुधाची किंमत आता रिटेलर्स मध्ये ८७ रूपयांवरून ८९ रूपये होणार आहे. पुढील सहा महिने हे दर कायम राहतील. नंतर MMPA किंमतींचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेईल. तर होलसेल मध्ये म्हशीच्या दूधाचे दर ९३ ते ९८ रूपये प्रति लीटर पर्यंत पोहचण्याचा अंदाज आहे.

सणासुदीच्या काळात मिठाई बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणात दूधाचा वापर केला जातो. त्यामुळे सामान्यांच्या खिशाला मिठाईसाठी फटका बसण्याचा अंदाज आहे. मुंबई दररोज ५० लाख लिटर पेक्षा अधिक म्हशीच्या दुधाचा वापर केला जातो. त्यापैकी ७००,००० लीटरहून अधिक MMPA द्वारे दुग्धशाळा, शेजारील किरकोळ विक्रेते आणि शहराच्या आसपास पसरलेल्या शेतात पुरवठा केला जातो. सर्व गाय आणि म्हशी दूध उत्पादक संघटना आणि ब्रँडेड कंपन्यांनी लोकसभा निवडणुकीमुळे फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये नियमित दरवाढ टाळली होती. महाराष्ट्रातील काही घाऊक विक्रेते आणि गाईच्या दुधाच्या प्रमुख ब्रँडेड उत्पादकांनी दुधाच्या दरात २ रुपयांची वाढ केली होती. आता MMPA द्वारे आगामी दरवाढीमुळे, ते पुढील महिन्यापासून देशांतर्गत Domestic Finances वर आणखी ताण टाकून त्यांच्याप्रमाणेच दरवाढ करण्याचा अंदाज आहे.

स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ,

जा.क्र. अंनप/आरोग्य विभाग/२०२४-२५/१३३ दि. २९/०८/२०२४

**जाहिर आवाहन**

अंबरनाथ नगरपरिषदेमार्फत शहरातील सर्व गणेशभक्तांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, श्रीगणेश उत्सव साजरा करताना पर्यावरणाची हानी होणार नाही याकरिता शासनाने दिलेल्या निर्देशाचे पालन करण्यात यावे.

- प्लास्टर ऑफ पॅरिस पासुन बनविलेली गणेशमुर्ती उत्सवाकरीता वापरण्यात येवु नये
- पर्यावरणपुरक शाडुच्या मातीपासुन बनविलेल्या गणेश मुर्तीचा वापर करावा.
- सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने पर्यावरण पुरक अशा पध्दतीने सजावट करावी.
- उत्सवादरम्यान निघालेले निर्माल्य नदीपात्रात विसर्जित न करता नगरपरिषदेने ठेवलेल्या निर्माल्य कलशामध्ये जमा करावे.
- श्रीगणेश मुर्तीचे विसर्जन नदिपात्रात, नैसर्गिक ओढयामध्ये व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतामध्ये न करता नगरपरिषदेने शहरामध्ये विविध ठिकाणी तयार केलेल्या कृत्रिम तलाव, रबरी कुंड यामध्येच करावे.

सर्व श्रीगणेश भक्तांनी व श्रीगणेश मंडळांनी उपरोक्त सुचनांचे तंतोतंत पालन करुन येणारा उत्सव आनंदाने व आरोग्यमय, पर्यावरण पुरक साजरा करुन नगरपरिषदेस सहकार्य करावे.

सही/-
अतिरिक्त मुख्याधिकारी
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -
■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

# कुशल वाहन चालकांना मिळणार जर्मनीत रोजगाराची संधी

ठाणे : उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण क्षेत्रातील कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, मुरबाड तालुक्यातील कुशल वाहन चालक यांना जर्मनीतील बाडेन बुटेबर्ग जिल्ह्यासाठी महाराष्ट्र सरकारने जर्मनीत रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली आहे. कुशल वाहन चालकांना प्रशिक्षण, जर्मनी भाषेचे ज्ञान, तसेच वाहतूकीचे नियम या संदर्भातील प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र शासन प्रत्येक व्यक्तीकरिता सुमारे ३३ हजार रुपये प्रशिक्षण खर्च करणार आहे. तरी जास्तीत जास्त वाहनचालकांनी https://meqr.com/Slxmzhwy या संकेस्थळावर सहभाग नोंदवावा, असे आवाहन कल्याण उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी केले आहे. जर्मनीतील बाडेन बुटेबर्ग या राज्यासोबत महाराष्ट्र सरकारने विविध १० हजार कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. ज्यामध्ये वाहन चालक या पदाचा समावेश केला असून याच करारानुसार ठाणे जिल्ह्यातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण क्षेत्रातील कल्याण, अंबरनाथ, बदलापुर, मुरबाड तालुक्यातील होतकरू वाहनचालकांना जर्मतील रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

## भारतीय रेल्वे

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/




■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

### भारतीय सर्वोच्च न्यायालय

■ जागा : ८० जागा
■ पदाचे नाव:
१ ज्युनियर कोर्ट अटेंडंट (स्वयंपाकाचे
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) पाककला डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: दिल्ली
■ Fee: General/OBC: ४००/- SC/ST/PWD/ExSM²: २००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १२ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.sci.gov.in/

### केंद्रीय लोकसेवा आयोग

■ पदाचे नाव :
१ डेप्युटी सुपरिटेंडिंग आर्कियोलॉजिस्ट ६७
२ केबिन सेफ्टी इंस्पेक्टर १५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) पदव्युत्तर पदवी (Archaeology/Indian History/-nthropology) (ii) PG डिप्लोमा/एडवांस डिप्लोमा (Archaeology) किंवा ०३ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) केबिन क्रू म्हणून दहा वर्षांचा अनुभव आणि सध्या केबिन क्रू म्हणून कार्यरत.
■ वयाची अट: ०५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० वर्षांपर्यंत
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: २५/- SC/ST/PH/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ सप्टेंबर २०२४ (११:५९ PM²)
■ अधिकृत वेबसाईट https://upsc.gov.in/

### उत्तर रेल्वे

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/PWD/महिला: फी नाही
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते

# क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षण संस्थांचा गौरव



ठाणे : महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरणांतर्गत शालेय जिल्हास्तर क्रीडा स्पर्धा वयोगट १४, १७, व १९ वर्षे वयोगटाखालील राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून प्रथम तीन क्रमांकाच्या शैक्षणिक संस्थांना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृह येथे गौरविण्यात आले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुवर्णा बारटक्के, तालुका क्रीडा अधिकारी सायली जाधव, रुही शिंगाडे, विविध शिक्षण संस्थाचे प्रमुख, क्रीडा प्रशिक्षक, जिल्हा क्रीडा कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

जगप्रसिद्ध हॉकीपटू मेजर ध्यानचंद सिंग यांनी हॉकीमध्ये जागतिक स्तरावर भारताचे प्रतिननिधीत्व करून केलेल्या कामगिरीचा गौरव म्हणून त्यांचा जन्मदिन दि.२९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त देशभरात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिनाचे औचित्य साधून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षण संस्थांना यामध्ये प्रोत्साहनात्मक अनुदान २०२३-२४ वयोगट १४ वर्षे- प्रथम क्रमांक- फादर ग्रेल मल्टीपर्पज स्कूल आणि ज्युनियर कॉलेज वाशी, द्वितीय क्रमांक- श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया शाळा, ठाणे. तृतीय क्रमांक- स्वामी देवप्रकाश शाळा, उल्हासनगर, या संस्थांना जिल्हाधिकारी शिनगारे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

प्रोत्साहनात्मक अनुदान २०२३-२४ वयोगट १७ वर्षे प्रथम क्रमांक- फादर ग्रेल मल्टीपर्पज स्कूल आणि ज्युनियर कॉलेज वाशी, द्वितीय क्रमांक- एस.ई.एस. इंग्रजी माध्यम हायस्कूल, उल्हासनगर, तृतीय क्रमांक- स्कॉलर्स इंग्लिश हायस्कूल आणि जे. आर. कॉलेज, भिवंडी यांना श्री.शिनगारे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

प्रोत्साहनात्मक अनुदान २०२३-२४ वयोगट १९ वर्षे प्रथम क्रमांक- श्रीमती सी.एच.एम कॉलेज, उल्हासनगर, द्वितीय क्रमांक- एस.एस.टी. कॉलेज उल्हासनगर, तृतीय क्रमांक - वेदांत कॉलेज, उल्हासनगर यांना शिनगारे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी उपस्थिांना मार्गदर्शन करताना शिनगारे म्हणाले की, खेळाडूंच्या अंगी असलेले क्रीडा कौशल्य दाखविण्यासाठी क्रीडा स्पर्धांचा फार चांगला उपयोग होतो. खेळामध्ये आपल्याला खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. ज्या शालेय संस्थांना यश आले आहे त्यांचे अभिनंदन. ज्यांना यश मिळाले नाही त्यांनी खेळाविषयी अभिमान बाळगून सतत खेळत राहावे. तसेच खेळामध्ये आपण आपल्या जिल्ह्याचे नाव मोठे करु या, असे आवाहनही जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांनी केले. तर आभार प्रदर्शन क्रीडा अधिकारी सुचिता ढमाले यांनी केले.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४ चे आयोजन

ठाणे : दि.०७ सप्टेंबर २०२४ पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या शासन स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे.

शासनाने निश्चित केलेल्या निकषाच्या आधारे पुरस्कारासाठी निवड करण्यात येणार आहे. शासनाने ठरविलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या किंवा करु शकणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीच स्पर्धे साठी अर्ज करावयाचा असून अर्जाचा नमुना, गुणांकनाचे निकष, आवश्यक कागदपत्रे, फोटो व व्हिडीओबाबत तपशील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.३१ जुलै २०२४ च्या शासन निर्णयामध्ये दिला आहे. (हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धे साठीचे परिपूर्ण अर्ज प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई यांच्या mahotsav.pldagmail.com या ई-मेलवर दि.३१ ऑगस्ट २०२४ पूर्वी ऑनलाईन सादर करावयाचे आहेत.



सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून प्राप्त झालेले जिल्हानिहाय अर्ज प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास दि.०५ सप्टेंबर २०२४ पूर्वी उपलबध करुन देतील.

जिल्हास्तरीव निवड समिती प्रत्येक गणेशोत्सव मंडळास अभिप्रायासह गुणांकन देईल. जिल्हास्तरीय समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या ४ जिल्ह्यातून प्रत्येकी ३ व अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी १ उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची शिफारस प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे कला अकादमी यांच्यामार्फत ई-मेलद्वारे राज्यस्तरीय निवड समितीकडे करेल.

राज्यस्तरीय समिती प्राप्त शिफारशीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमधून गुणांकन व संबंधित कागदपत्रांच्या आधारे पहिल्या ३ विजेत्यांची निवड करतील. राज्यस्तरीय पहिल्या ३ विजेत्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येईल.

### पारितोषिकांची रक्कम पुढीलप्रमाणे–

प्रथम क्रमांक रु.५.०० लक्ष, द्वितीय क्रमांक रु.२.५ लक्ष, तृतीय क्रमांक रु.१.०० लक्ष.

वरीलप्रमाणे ३ विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांस राज्य शासनाकडून प्रत्येकी रु.२५ हजार चे पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात येईल, अशी माहिती ठाणे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हास्तरीय गणेशोत्सव समितीचे सदस्य सचिव वैभव कुलकर्णी यांनी दिली आहे.

# पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ घेण्यासाठी मुदतवाढ

ठाणे : शासनाने राज्यातील मान्यताप्राप्त शासकीय, शासन अनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालय/तंत्रनिकेतनांमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना निवासी व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये, यासाठी शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम् योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र वसतिगृह निर्वाह भत्ता योजना लागू करण्यास मान्यता दिली आहे.

त्यानुषंगाने शासनातर्फे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत अर्ज स्वीकृतीस दि.३१ जुलै २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि अद्यापी उच्च शिक्षण विभागातील काही अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याने विद्यार्थ्यांना विहित वेळेत अर्ज करण्यास शक्य न झाल्याने संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडून अर्ज स्वीकृतीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

उच्च शिक्षणाच्या द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.३ सप्टेंबर २०२४ असून याची निवड यादी दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर केली जाणार आहे. तर प्रथम वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.१५ ऑक्टोबर २०२४ असून याची निवड यादी दि.३० ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर केली जाणार आहे, असे इतर मागास बहुजन कल्याण, सहायक संचालक समाधान इंगळे यांनी कळविले आहे.

# पालिकेच्या सर्व शाळेत सी.सी. कॅमेरे बसविणार

## शालेय स्तरावर तक्रार पेटी, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षितता समिती स्थापन करा, पोलीस विभागाकडून तपसाणी करणार : पालिका आयुक्त अजय वैद्य

भिवंडी : बदलापूर येथील मुलीचे छेडछाड प्रकरण ताजे असताना, भिवंडी पालिका शाळा क्र. ७९ मध्ये देखील असाच प्रकार घडला आहे या घटनेची पालिका आयुक्त आजय वैद्य यांनी तात्काळ दखल घेत सदर शिक्षकाचे तातडीने निलंबन करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पालिकेतील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सर्व मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख यांची तात्काळ बैठक घेवून पालिकेच्या व अन्य कोणत्याही शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी यांची कोणत्याही प्रकारे छेडछाड, त्यांना कोणत्याही प्रकारे असा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यायची आहे. महिला शिक्षीका ज्या आहेत त्यांनी मुलींशी संवाद साधावा. त्यांना विश्वासात घेऊन त्यांना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श याची कल्पना द्यावी. आपल्या शाळेत नागरिक पालक गरीब घरातील असल्याने पालिकेच्या शाळेत मुलांना अत्यंत विश्वासाने पाठवतात त्या सर्व मुलाची काळजी घेणे आवश्यक आहे.



शाळेतील विद्यार्थी वर्गाला कोणत्याही प्रकारे मानसिक व शारीरीक त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी राज्य शासनाने दिलेल्या निकषाप्रमाणे सर्व शाळांमध्ये सि.सि.टीव्ही लावणे, सि.सि.टिव्ही सातत्याने तपसाणी, पोलीस विभाग यांनी देखील अशा शाळांची तपसाणी, महाविद्यालंयात भेट देऊन चौकशी करणार, सर्व शाळांची गोपनीय तपासणी करणार, सर्व शाळेतील मुलांना चांगला स्पर्श, वाईट स्पर्श, महिला व विद्यार्थी वर्गाच्याकडे बघून चुकीचे हावभाव, चुकीचे हातवारे करणे यावर लक्ष ठेवा. सर्व शाळेत तक्रार पेटी ठेवावी. तक्रार पेटींची दखल तात्काळ घ्या, शाळेत सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षितता समिती स्थापन करा अशा सुचना पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी सर्व पालिका शाळेतील मुख्याध्यापक, केंद्र शिक्षक यांना दिल्या आहेत.

आपल्या शाळेच्या विद्यार्थी वर्गावर लक्ष द्या कोणत्याही प्रकारे गैरकृत्य खपवून घेतले जाणार नाही. असा काही प्रकार आढळ्यास तातडीने वरीष्ठांच्या निदर्शानास आणून द्या, एखादा प्रकार लपवणे, अशा अनुचित प्रकाराला पाठिंबा देणे या सर्व गैरकृत्याच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात य़ेईल याची सर्वांनी नोंद घ्यावी असा ईशारा पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी दिला आहे. पालिकेत विलासराव देशमुख सभागृहात झालेल्या या बैठकीला शिक्षण विभाग उपायुक्त बाळाराम जाधव, माध्यमिक शिक्षण विभाग सहायक आयुक्त सुनिल झळके, समाज कल्याण विभाग सहायक आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले उपस्थित होते.

# शुक्रवारी पनवेलमध्ये 'आम्ही सावित्रीच्या लेकी २०२४' पुरस्कार सोहळा

पनवेल : सामाजिक, शैक्षणिक, कला, संस्कृती, क्रीडा अशा विविध क्षेत्रात गेली ३० वर्षांहून अधिक काळ उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि दैनिक लोकमत वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट रोजी पनवेलमध्ये कर्तृत्ववान महिलांचा 'आम्ही सावित्रीच्या लेकी २०२४' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी १०. ३० वाजता होणाऱ्या या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तर विशेष अतिथी म्हणून पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व माजी सभागृहनेते परेश ठाकूर, मराठी नाट्य-सिने अभिनेते अंशुमन विचारे यांची उपस्थिती असणार आहे.

# कोपरखैरणेत पदपथांची दुरुस्ती अखेर सुरू

नवी मुंबई : कोपरखैरणेतील पदपथांची अतिशय वाईट अवस्था झाली असून पदपथांवरून चालणे धोक्याचे झाले आहे. याबाबत शनिवारी 'कोपरखैरणेत पदपथांची दुरवस्था'या मथळ्याखाली लोकसत्ताने बातमी प्रसिद्ध करताच मनपाच्या संबंधित विभागाला जाग आली असून पदपथांच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे.

कोपरखैरणे परिसराच्या अंतर्गत भागात पदपथांची अवस्था अतिशय वाईट असून त्यावरून चालणे धोक्याचे ठरत आहे. अनेक ठिकाणी मॅनहोलची झाकणे तुटली आहेत. त्यातच पेव्हर ब्लॉक उखडले गेले असून येथे कायम तात्पुरत्या डागडुजीवर भागवले जात आहे.

सेक्टर १९ येथील संतोषी माता मैदानाबाहेरील पदपथावर तर तीन ते चार फूट खोल खड्डा पडला होता. एखाद्या पादचाऱ्याला इजा होऊ नये म्हणून दोन्ही बाजूला दोरी बांधण्यात आली होती. तसेच तीन टाकीसमोरील पदपथावर मॅनहोलवरील झाकण तुटलेले होते. सुमारे महिन्याभरापूर्वी तुटलेल्या झाकणावर तात्पुरती फळी टाकण्यात आली. ही फळी तुटल्यावर शेजारी कचऱ्यात पडलेल्या लाकडी खुर्ची सारखा कोच ठेवण्यात आला होता. याबाबत बातमीत छायाचित्रासह निदर्शनास आणून देण्यात आले होते. बातमी प्रसिद्ध झाल्यावर संबंधित प्रशासनाला खडबडून जाग आली असून अतिखराब अवस्थेतील पदपथ दुरुस्ती सुरू करण्यात आली आहे. पावसाळा झाल्यावर अन्य दुरुस्ती करण्यात येईल, अशी माहिती संबंधित विभागाने दिली.

## युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा

# दुर्घटनाग्रस्त ठिकाणी तत्काळ पुतळा उभा करावा

- राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांनी साधला माध्यमांशी संवाद
- छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दुर्घटनाग्रस्त घटना ही संतापजनक, मनाला वेदना देणारी या घटनेचा निषेध करण्यासाठी ठाणे राष्ट्रवादी काँग्रेसचे मुक आंदोलन
- विरोधकांसह महायुतीतल्या नेत्यांनाही भावना दुखावतील असे वक्तव्य करु नये तसेच या प्रकरणाचे राजकारण करु नये
- शासनाने संबंधितांवर कठोर कारवाई करायला हवी, ही कारवाई शब्दातून नाही तर कृतीतून महाराष्ट्रातील जनतेला दिसायला हवी

ठाणे : मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दुर्घटनाग्रस्त घटना संतापजनक आणि मनाला वेदना देणारी आहे. महाराष्ट्रातल्या जनतेमध्ये संतापाची लाट या घटनेमुळे पसरली आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री तसेच गृहखाते सांभाळणारे देवेंद्रजी फफडणवीस या दोन्ही नेत्यांना विनंती आहे की, या दुर्घटनेसाठी जबाबदार असलेले शिल्पकार, कन्सल्टन्ट, कंत्राटदार, सरकारी पीडब्लूडीचे अधिकारी या सर्व संबंधितांवर कठोर कारवाई करायला हवी आणि ही कारवाई शब्दातून नाही तर कृतीतून महाराष्ट्रातील जनतेला दिसायला हवी. तसेच लवकरात लवकर तिथे युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पुन्हा उभारायला हवा, हे काम महायुतीने त्वरित करायला हवे. कालच राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेची या घडलेल्या घटनेबद्दल जाहीर माफी मागितली आहे. आम्ही जरी सत्तेत असलो तरी झालेल्या दुर्दैवी घटना ही संतापजनक आहे. यामुळे ठाण्यातील राष्ट्रवादीचे कार्यकर्त्यांनी या घटनेच्या निषेधार्थ जाहीर मूक आंदोलन केले. असे मत माध्यमांशी संवाद साधताना प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी व्यक्त केले.




महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये अनेक भ्रष्टाचाराच्या घटना झाल्या त्याचीही जाहीर वाच्यता संजय राऊत यांनी करावी. युगपुरुष, छत्रपती शिवाजीमहाराज यांचा विषय हा राजकारणाचा असूच शकत नाही. छत्रपती शिवाजीमहाराज हे महाराष्ट्राच्या अस्मितेचा, गौरवाचा विषय आहे. त्यामुळेच विरोधकांसह महायुतीतल्या नेत्यांनाही विनंती आहे की महाराष्ट्रील शिवप्रेमी, महाराष्ट्राची जनता छत्रपती शिवाजीमहाराज यांना अराध्यदैवत मानते. यामुळेच त्यांच्या भावना दुखावतील असे कुठलेही वक्तव्य कोणीही करु नये आणि या प्रकरणाचे राजकारणही करु नये. जनतेची हीच इच्छा आहे की राजकारण करण्यापेक्षा दोषींवर तत्काळ कडक कारवाई व्हावी आणि पुन्हा एकदा युगपुरुष, छत्रपती शिवाजीमहाराज यांचा भव्य पुतळा त्याच ठिकाणी उभारण्यात यावा. बदलापूर येथील घडलेली घटना संवेदनशील आहे. लहान बालिकांबरोबर जे दुष्कृत्य झाले याप्रकरणी एसआयटीची कारवाई सुरु आहे. मालवण येथील राजकोटची पुतळ्याची जी दुर्दैवी घटना घडली, त्या दोन्ही घटनांकडे महायुतीचे शासन अत्यंत संवेदनशीलपणे बघत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे राजकोट घटनेची सातत्याने माहिती घेत आहेत येथे प्रत्यक्ष जाऊन राजकारण करण्यापेक्षा कृतीच्या माध्यमाने काम करणे अजितदादा पसंद करतात. म्हणूनच संकोच न बाळगता अजितदादांनी या दुर्दैवी घटनेबद्दल महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेची माफी मागितली, असे प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांनी स्पष्ट केले

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार, प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांच्या नेतृत्वाखाली, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ठाणे शहर (जिल्हा) च्या वतीने गुरुवारी, २९ ऑगस्ट, २०२४ रोजी, सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा, तलावपाळी, ठाणे येथे मूक आंदोलन करण्यात आले, याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष दत्ता चव्हाण, जिल्हा सरचिटणीस प्रभाकर सावंत, रविंद्र पालव, महिला अध्यक्षा वनिता गोतपागर, महिला कार्याध्यक्ष मनिषा भगत, मा. नगरसेविका वहिदा खान, अंकिता शिंदे, रुपाली गोटे, परिवहन समिती सदस्य नितीन पाटील, युवक प्रदेश पदाधिकारी आदित्य धुमाळ, युवक कार्याध्यक्ष संदेश पाटील, विद्यार्थी अध्यक्ष कौस्तुभ गायकवाड, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष मंगेश सुर्यवंशी, अल्पसंख्यांक विभागाचे कार्याध्यक्ष रिकी मुरझेलो, आरोग्य सेल अध्यक्ष अविनाश पवार, विधानसभा अध्यक्ष अजय सकपाळ, विजय भामरे, महिला विधानसभा अध्यक्षा सुवर्णा खिल्लारी, अरुणा पेंढारे, युवती विधानसभा अध्यक्षा नेहा नाईक, सोनिया माने तसेच सर्व जिल्हा कार्यकारिणी सदस्य, विधानसभा अध्यक्ष, कार्याध्यक्ष, ब्लॉक अध्यक्ष, कार्याध्यक्ष, वॉर्ड अध्यक्ष तसेच सर्व फ्रंटल विभाग, सेलचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# जयदीप आपटे यांच्या घराला काळे फासले

## संभाजी ब्रिगेडची आपटेंच्या घरासमोर निदर्शन

कल्याण : मालवण राजकोट येथील शिवरायाचा पुतळा कोसळण्यास कारणीभूत असलेले येथील शिल्पकार जयदीप आपटे यांच्या घरासमोर गुरुवारी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली. यावेळी आपटे यांच्या बंद दरवाजाला काळे फासण्यात आले. शिल्पकार आपटे यांच्या प्रतीमेवर शिवद्रोही लिहून ती भित्तीचित्रे आपटे यांच्या दरवाजावर झळकवली.

यावेळी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी शिल्पकार आपटे यांना पाठबळ देणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही टीका केली. जगाला अभिमान असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्यास या पुतळ्याच्या कामात झालेला गैरव्यवहार, निकृष्ट दर्जाचे काम या दोन मुख्य गोष्टी कारणीभूत आहेत. त्यामुळे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या शिल्पकार जयदीप आपटे यांना आम्ही धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. त्यांनी निकृष्ट काम करून महाराजांना अपमान केला आहे, अशा शब्दात ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी आपटे यांचा निषेध



केला.

यावेळी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी आपटे यांच्या बंद असलेल्या घराच्या दरवाजाला काळे फासले. दरवाजा काळाकुट्ट केला. पुतळा कोसळल्याची घटना घडल्यानंतर सिंधुदुर्ग येथे जात आहे असे सांगून शिल्पकार जयदीप आपटे घरातून बाहेर पडले आहेत, असे त्यांच्या कुटुंबीयांकडून सांगण्यात येते. त्यांचा मोबाईल बंद आहे.

शिल्पकार आपटे यांच्यावर मालवण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मालवण पोलीस गुरुवारी सकाळी कल्याणमध्ये दाखल झाले. बाजारपेठ पोलिसांच्या साहाय्याने त्यांनी आपटे यांचे घर पाहिले. तेथे टाळे होते. त्यांची पत्नी निशिगंधा ही सुरक्षिततेच्या दृष्टीने कल्याण मधील घरात न राहता माहेरी आपल्या आई, वडिलांच्या घरी राहण्यास गेली आहे. पोलिसांनी तिच्या घरी जाऊन तिचा जबाब नोंदवला. मालवण येथील शिवरायांचा पुतळा उभारल्यानंतर आपटे यांचे कल्याण मधील विविध संस्थांनी त्यांचे कौतुक केले होते. कल्याणमधील खडकपाडा येथील स्वदेशी भारताचा संदेश देणारा सिंहाचा पुतळा शिल्पकार आपटे यांनी उभारला आहे.

# इनरव्हील क्लब ऑफ पनवेलचा उपक्रम

पनवेल : समाजसेवी उपक्रमात अग्रगण्य असलेल्या इनरव्हील क्लब ऑफ पनवेल या संस्थेतर्फे पनवेल जवळील तळोजा कारागृहात कैद्यांना इनरव्हील च्या मेंबर्सनी राखी बांधून तसेच २०० पुस्तक तळोजा जेलच्या लायब्ररी साठी दिले. त्यांच्या जीवनातील भाऊ बहिणीच्या सणाचे पावित्र्य राखून आनंद निर्माण केला. क्लबच्या मेंबर ॲड. संगीता रोकडे यांनी या संबंधात कारागृह प्रशासनाची परवानगी काढण्याचे महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. त्यामुळे क्लबच्या १२ मेंबर्स ना प्रवेश घेता आला. क्लब प्रेसिडेंट डॉक्टर विना मनोहर यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करून दोनशे भावांना आनंद मिळवून दिला. यानंतर इनरव्हील क्लब मेंबर ॲड. सुनीता जोशी यांनी कारागृहातील कैद्यांशी संवाद साधला.

# उल्हासनगर पालिका अतिरिक्त आयुक्तांवर विनयभंगाचा गुन्हा

## जाहिरात घोटाळ्यातील कारवाई रोखण्याचा प्रयत्नाचा अधिकाऱ्यांचा आरोप

ठाणे : उल्हासनगर महापालिकेतील अतिरिक्त आयुक्तांवर विनयभंगाप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांनी याप्रकरणी खुलासा केला असून शहरातील जाहिरात घोटाळ्यातील कारवाई रोखण्यासाठी हा खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे लेंगरेकर यांनी सांगितले आहे. या प्रकारानंतर पालिकेत एकच खळबळ उडाली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

उल्हासनगर महापालिकेत कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असलेल्या महिलेने मध्यवर्ती पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जून २०२३ मध्ये लेंगरेकर यांनी आपल्या दालनात बोलवून लगट करत विनयभंग केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

एप्रिल २०२२ ते जुलै २०२३ या काळात वेळोवेळी लेंगरेकर यांनी फिर्यादी यांना बोलून त्यांना मानसिक त्रास दिल्याचा आरोप आहे. तसेच गेल्या सहा महिन्यापासून वेगवेगळ्या विभागात बदली करून मानसिक त्रास दिल्याचाही आरोप महिलेने केला आहे. वडिलांच्या आजारपणामुळे गुन्हा दाखल करण्यास उशिर झाल्याचे फिर्यादींनी तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर उल्हासनगर महापालिकेत एकच खळबळ उडाली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर लेंगरेकर यांनी आयुक्त यांना लेखी स्पष्टीकरण दिले आहे.

संबंधित लिपिक महिला यांनी मालमत्ता विभागांतर्गत जाहिरात परवाना कामकाज करताना मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि गैरव्यवहार केला आहे, असा आरोप त्या खुलाशात लेंगरेकर यांनी केला आहे. याबाबत तत्कालीन आयुक्तांची मान्यता घेऊन लेखा परिक्षण करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच त्यांनी पंचशील जाहिरात संस्थेला अवाजवी लाभ मिळवून देण्यासाठी आपल्या पदाचा दुरुपयोग केला असल्याचे अभिलेखावरुन आणि त्यांच्या कामकाजावरुन दिसून आल्याने त्यांच्याबाबतीत प्रशासकीय कारवाई होणार हे लक्षात आल्याने त्यांनी माझ्याबद्दल आयुक्तांकडे, महिला तक्रार निवारण समितीकडे तक्रार केली होती, असेही लेंगरेकर त्यांनी खुलाशात म्हटले आहे.

तसेच फिर्यादी महिला आणि पंचशील जाहिरात संस्थेला पुन्हा जाहिरात परवान्याचे काम देण्यासाठी दबाव टाकत होते, असाही आरोप खुलाशात केला आहे. संबंधित जाहिरात संस्थेने परवानगीच्या दुप्पट जाहिराती लावल्याचा आरोप आहे. यात पालिकेचा महसूल आणि कर बुडाल्याचा संशय पालिकेला आहे.

### प्रकरण नेमके काय

घाटकोपर येथील होडींग दुर्घटनेनंतर शासनाच्या आदेशानुसार उल्हासनगर महापालिकेने अनधिकृत होर्डींगची तपासणी केली असता पंचशील यांच्या सर्वात जास्त अनधिकृत होर्डींग होत्या, अशी माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे. त्यांच्यावर निष्कासनाची कारवाई आणि ३ गुन्हेही दाखल करण्यात आले. यात पंचशील जाहिरात संस्थेला लाभ मिळेल अशा संचिका तयार करून सादर केल्याचा आरोपही संबंधित फिर्यादींवर आहे. याप्रकरणात कारवाई होण्याच्या भितीने हा गुन्हा दाखल केल्याचा आरोप लेंगरेकर यांनी केला आहे. असा गुन्हा दाखल होणार अशी शक्यता असल्याने लेंगरेकर यांनी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात तसे पत्रही दिले होते.

# मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अवजड वाहनांना प्रवेश बंदी

वसई : वाढवण बंदराच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पालघर येथे येणार आहेत. त्यांच्या दौऱ्या दरम्यान वाहतुकीची समस्या निर्माण होऊ नये यासाठी मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर दोन दिवस जड- अवजड मालवाहतूक वाहनांना बंदी घालण्यात आली आहे.

शुक्रवारी पालघर येथे वाढवण बंदराचा भूमिपूजन सोहळा पार पडणार आहे. यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अन्य मंत्री दाखल होणार आहेत. त्यांच्या दौरा सुरू असताना वाहतूक समस्या निर्माण होऊ नये यासाठी वाहतूक जिल्हाधिकारी कार्यालय व वाहतूक पोलीस यांच्या मार्फत वाहतूक नियोजन करण्यात येत आहे. विशेषतः मुंबई गुजरातला जोडणारा मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर जड - अवजड वाहनांना प्रवेशबंदी घालण्यात आली आहे. तसे आदेश पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्ध केले आहेत.

गुजरात बाजुकडून मुंबई बाजुकडे व मुंबई बाजुकडून गुजरातकडे या दोन्ही मार्गावरून गुरुवारी सकाळी ९ वाजल्यापासून ते शुक्रवारी रात्री ८ वाजेपर्यंत जड- अवजड वाहनांची वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. जिवनावश्यक वाहने, पोलीस वाहने,रुग्णवाहिका, अग्निशमन दल वाहने, सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने येणारी वाहने, प्रवासी वाहतुक करणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेस व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना प्रवेश सुरू राहणार आहे. अशा सूचना जिल्हाधिकारी कार्यालय पालघर यांनी दिल्या आहेत.

# सिडकोचे खारघरचे घर २ कोटींना; पहिल्याच दिवशी १२०० इच्छुकांची नोंदणी

पनवेल : कळंबोली, खारघर आणि घणसोली या नोडमधील २१३ सदनिकांना सिडकोच्या महागृहनिर्माण सोडतीमध्ये सर्वाधिक मागणी आहे. सोडत जाहीर केल्यापासून १२०० इच्छुकांनी सोडतीमध्ये अर्ज नोंदणी केली. १२०० इच्छुकांनी अर्ज नोंदणी केली असली तरी उच्च उत्पन्न गटातील सदनिकांच्या किमती १ कोटी १३ लाख ते २ कोटी रुपयांपर्यंत असल्याने या उत्पन्न गटापर्यंतील अर्जदाराचे स्वत:चे एकही नवी मुंबईत घर नसावे या धोरणामुळे अनेक इच्छुकांची इच्छा असून सिडकोच्या या सोडतीमध्ये सहभाग घेता येत नसल्याची खंत अनेकांनी व्यक्त केली. सिडको मंडळाने त्यांच्या पणन विभागातील काही धोरणामध्ये बदल करून काही नियमांना शिथिल करण्याची मागणी गुंतवणूकदारांकडून होत आहे.

सोमवारपासून (ता.२७ ऑगस्ट) नवी मुंबईतील कळंबोली, खारघर, घणसोली या उपनगरांमध्ये नोडमधील २१३ आणि सिडकोच्या खारघर येथील व्हॅलीशिल्प, स्वप्नपूर्ती व वास्तुविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिकांच्या विक्रीकरिता सोडत जाहीर केली. या सोडतीचा निकाल १० ऑक्टोबरला जाहीर होणार आहे.

या सोडतीमध्ये कळंबोली, खारघर आणि घणसोली उपनगरातील २१३ सदनिकांपैकी ३८ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आणि १७५ सदनिका या सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध आहेत.

आर्थिक दुर्बल घटकातील यशस्वी अर्जदारांना केंद्र सरकारचे दीड लाख व महाराष्ट्र सरकारचे एक लाख असे अडीच लाख रुपये अनुदान मिळणार असल्याने सर्वाधिक अर्ज याच योजनेसाठी आले आहेत. तसेच सिडकोच्या खारघर येथील व्हॅलीशिल्प, स्वप्नपूर्ती आणि वास्तुविहार- सेलिब्रेशन गृहसंकुलांतील उपलब्ध ६८९ सदनिकांपैकी ४२ सदनिका या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता, ३५९ सदनिका अल्प उत्पन्न गटाकरिता, १२८ सदनिका मध्यम उत्पन्न गटाकरिता आणि १६० सदनिका या उच्च उत्पन्न गटाकरिता उपलब्ध आहेत.

व्हॅलीशिल्प सोसायटीमध्ये ९५.१८ चौरस मीटरच्या १३६ सदनिका सोडतीमध्ये असून चार खोल्या असलेली ऐसपैस सदनिकेची सिडकोची दोन कोटी पाच लाख रुपये एवढी किंमत आहे. तसेच उच्च उत्पन्न गटातील खारघर येथील सेलिब्रेशन सोसायटीमधील ७९.१८ चौरस मीटरच्या २३ सदनिका उपलब्ध आहेत. याची एका सदनिकेची किंमत १ कोटी १३ लाख ९३ हजार रुपये दर्शविण्यात आली आहे.

मध्यम उत्पन्न गटाच्या सेलिब्रेशन सोसायटीमध्ये १० सदनिका असून ४३ चौरस मीटरच्या सदनिकांसाठी ६६ लाख रुपये सिडकोने दर्शविले आहेत. या सोडतीमध्ये उच्च उत्पन्न गटाच्या घरांच्या सोडतीमध्ये अल्प प्रतिसादानंतरच सिडकोचे संचालक मंडळ या सदनिकांच्या किंमती बाजारभावापेक्षा कमी करेल असे चित्र सिडकोच्या कारभारात दिसत आहे. याविषयी सिडकोच्या जनसंपर्क विभागाने माहिती दिली नाही.

## पर्यावरण पूरक व प्रदूषण मुक्त

# गणेश महाउत्सवासाठी मिरा भाईंदर पालिका सज्ज

**भाईंदर : गणेश उत्सव म्हटलं की सगळ्या आबाल वृद्धांचा जिव्हाळ्याच विषय. सगळ्या समाजाला एकत्र आणत आनंदात बांधणारा हा महाउत्सव. याच उत्सवासाठी घराघरात, मंडळात जशी तयारी सुरू आहेत तशीच जय्यत तयारी करत मिरा भाईंदर महानगर पालिका देखील या महाउत्सवासाठी सज्ज झाली आहे.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका कार्यक्षेत्रात गणेशोत्सव २०२४ नियोजनपूर्ण साजरा करण्यात येणार आहे. मिरा भाईंदर शहरातील गणेश उत्सव हा पर्यावरण पूरक व प्रदूषण मुक्त होण्यासाठी नागरिकांना आणि मंडळांना वेळोवेळी सूचना देण्यात येत आहे. प्लॅस्टर ऑफ पॅरिस पेक्षा शाडूच्या गणेश मूर्तीची प्रतिस्थापना करून हा गणेश उत्सव साजरा करावा तसेच थर्माकॉलचा वापर ना करता कागदी पुठ्ठयांचा वापर मखर तयार करण्याकरिता करावा असे आवाहन करण्यात आले आहे. मंडळाने रस्त्यावर खड्डे न पाडता मंडप बांधत मोठे मोठे होल्डीग लावून शहराचे विद्रुपीकरण होणार नाही यासाठी विशेष दक्षता घ्यावी अशी प्रत्येक मंडळाला विनंती करण्यात आली आहे. पीओपीच्या मुर्त्या तलावात विसर्जित केल्याने पाण्यामध्ये केमिकल जाऊन सदरच्या तलावातील पाणी दूषित होते. पर्यावरणाच्या दृष्टीने प्रदूषण मुक्त गणेश विसर्जनासाठी या हि वर्षी आयुक्त यांच्या निर्देशानुसार महापालिका सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शहरात ०४ ठिकाणी कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात करण्यात येणार असून गणेश उत्सवासाठी तेथे उत्तम असे सुशोभीकरण देखील करण्यात येणार आहे.

शहरातील शिवार गार्डन, मिरा रोड (पूर्व), सुभाषचंद्र बोस मैदान भाईंदर (प), जॉगर्स पार्क मिरा रोड (पूर्व) व स्व. आनंद दिघे मैदान, नवघर या ठिकाणी कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात येणार आहे. त्याचबरोबर भाईंदर पश्चिम धक्का, उत्तन, राव तलाव, नगरभवन, मुर्धा, राई, मोर्वा गांव, मोर्वा खाडी, भाईंदर (पूर्व) चौपाटी नवीन, भाईंदर (पुर्व) चौपाटी जुनी, शिवार गार्डन जूना घाट, शिवार गार्डन नवीन घाट, सातकरी तलाव, पेणकरपाडा, जरीमरी, नवघर नवीन तलाव, गोडदेव तलाव, लक्ष्मीबाग, घोडबंदर स्मशान, घोडबंदर रेतीबंदर, चेणा, काजूपाडा, महाविष्णू मंदिर, महाजनवाडी याठिकाणच्या २३ निसर्गिक तलावांची निवड करण्यात आली आहे. तसेच नागरिकांनी पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्याकरिता जवळच्या परिसरातील कुंडात किंवा कृत्रिम तलावात गणेश मूर्तीचे विसर्जन करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात आले असून मिरा भाईंदर शहरातील सर्व नागरिकांना गणेश उत्सवासाठी मनस्वी शुभेच्छा दिल्या आहेत.

# जलजन्य, किटकजन्य व साथरोग आजार नियंत्रक जनजागृती शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप /डेंग्यू तसेच जलजन्य व साथरोग आजाराचा प्रसार रोखण्यासाठी नमुंमपा आरोग्य विभागामार्फत विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून याव्दारे नागरिकांमध्ये हिवताप /डेंग्यू, जलजन्य व साथरोग आजार तसेच आरोग्याविषयी प्रभावी जनजागृती केली जात आहे.

या माध्यमातून २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचून त्यांच्यामध्ये हे आजार रोखण्यासाठी घ्यावयाची खबरदारी तसेच आजारी पडल्यास करावयाच्या उपाययोजना याबाबत जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. अशाच प्रकारची विशेष शिबिरे २८ ऑगस्ट रोजी २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत विविध ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. या शिबिरांच्या ठिकाणी भेट दिलेल्या १३,२५६ नागरिकांमध्ये जाणीव जागृती





करण्यात आली. तसेच यावेळी १२१६ रक्त नमुने घेण्यात आले. आत्तापर्यंत ५ वेळा अशा प्रकारच्या विशेष शिबिरांचे आयोजन २४ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांमार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी करण्यात आले असून या शिबीरांचा लाभ ४०,८२५ नागरिकांनी घेतला आहे.

या शिबिरांचे वैशिष्ट्य म्हणजे याठिकाणी नॉफिलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून तसेच नागरिकांना डासांच्या आळ्या प्रत्यक्ष दाखवून त्याचप्रमाणे घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती स्थाने उदा. पाणी साठवून ठेवलेले ड्रम हे ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे व आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करुन कोरडे ठेवणे, भंगार साहित्य, टायर्स इत्यादी नष्ट करणे, छतावरील प्लास्टिक शीट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे याबाबत नागरिकांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवित प्रोत्साहित करण्यात आले तसेच ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणेविषयी आवाहन करण्यात आले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने हिवताप / डेंग्यू नियंत्रणाकरिता आरोग्य विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासोबतच नवी मुंबईकर नागरिकांनी घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट केली तसेच आपले घर व परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी उकळून पिणे, भाजीपाला स्वच्छ धुवून वापरणे, उघडयावरचे अन्न खाणे टाळणे अशा गोष्टी काळजीपूर्वक केल्या तर नवी मुंबईत हिवताप / डेंग्यूच्या रुग्ण संख्येवर व जलजन्य / साथरोग आजारावर आळा घालणे शक्य होईल. तरी जागरूक नागरिकांनी याबाबत संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१